शनिवार दि.२९ जून २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३०१
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक बीड लोकनेता
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# महाराष्ट्राला नवी दिशा देणारा निर्धाराचा अर्थसंकल्प-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याचा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने महिला, युवक, शेतकरी यांचा सन्मान करून त्यांना मोठे बळ देणारा आहे. १ लाख कोटींच्या योजनांचा समावेश असलेला हा क्रांतिकारी अर्थसंकल्प दुर्बल, गोरगरीब, शेतकरी आणि युवकांचे भविष्य उज्वल करणारा आहे. महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या निर्धाराचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. हा महाराष्ट्राच्या विकासाचा गजर करणारा अर्थसंकल्प असल्याचेही त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत २०२४- २५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला.फेब्रुवारीत वित्तमंत्र्यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता.

मुख्यमंत्री म्हणाले, की राज्यातील महिला, बेरोजगार युवक-युवती यांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी या अर्थसंकल्पात महत्वपूर्ण तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलीना व्यावसायिक शिक्षण मोफत, पात्र कुटुंबाला वर्षाला ३ सिलेंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी १५ हजार कोटींचा प्रकल्प, शेतीपंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना संपूर्ण वीज माफी देणारी मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम, शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण, एकूणच दुर्बल घटकाचे दारिद्र्य नाहीसे करण्यासाठी केलेला निश्चय यामुळे हा अर्थसंकल्प वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. विशेषत: महिलांना शासनामार्फत दरमहा दीड हजार रुपये तसेच अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय तसेच कृषि विषयक सर्व व्यावसायिक पदवी-पदविका अभ्यासक्रमांसाठी मुलींना मोफत शिक्षण यामुळे राज्य शासनाने महिलांप्रती बांधिलकी व्यक्त केली आहे.

राज्य शासन शेतकऱ्यांच्या मागे पूर्ण ताकदीने उभे आहे हेही या अर्थसंकल्पातून दिसते असे सांगून



मुख्यमंत्री म्हणाले, की गाव तेथे गोदाम या नवीन योजनेमुळे धान्य साठवणुकीचा प्रश्न निकाली निघेल. कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ५ हजार अर्थसहाय, सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम, मागेल त्याला सौर उर्जा पंप या योजना देखील शेतकऱ्यांच्या आयुष्यात अमुलाग्र बदल घडवून आणतील.

जागतिक वारसा नामांकनासाठी पंढरपूर वारी, कोकणातील कातळशिल्पे, पंढरपूर वारी, दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सव याबाबतचे प्रस्तावही पाठविण्याचा तसेच रायगड किल्ल्यावर शिवराज्याभिषेक सोहळा दरवर्षी साजरा करण्याचा घेतलेला निर्णयही महत्वाचा आणि आपल्या संस्कृती व इतिहासाला जपण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्या मुख्य पालख्यातील दिंडींना प्रति दिंडी २० हजार रूपये, निर्मल वारी साठी निधी तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून देहू- आळंदी ते पंढरपूर या दोन्ही मुख्य पालखी मार्गावरील सर्व वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार करण्याची केलेली घोषणा म्हणजे आमची वारकरी संप्रदायाप्रती भक्तिभावाचे उदाहरण आहे, त्यासाठी मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापन करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

प्राधान्य क्षेत्रात आणि हरित हायड्रोजन क्षेत्रात मोठी गुंतवणूक करणार असल्याने गुंतवणुकीबरोबरच मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, की मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेतून दरवर्षी १० लाख तरुण-तरुणींना प्रशिक्षण मिळणार आहे. तंत्रशिक्षण संस्थांमध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्यात येणार असल्याने त्याचाही युवा वर्गाला मोठा फायदा होईल.

संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेत अर्थसहाय्य वाढविणे, विविध घटकांसाठी मोठ्या प्रमाणावर घरकुले बांधण्यासाठी तरतूद करणे, दिव्यांग व्यक्तींसाठी धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना यामुळे दारिद्र्य नाहीसे करण्यासाठी राज्य शासनाने खंबीर पाऊले टाकली असल्याचे स्पष्ट होते असेही मुख्यमंत्री म्हणाले.मुंबई, पुणे व नागपूर शहरांमध्ये एकूण ४४९ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका उभारण्यास मान्यता, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत २३ हजार किमी रस्त्यांची कामे, महापालिकांमध्ये पीएम ई-बस सेवा योजना राबविणे, बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत योजनेत ग्रामपंचायत कार्यालये बांधणे व इतरही प्रमुख पायाभूत्त सुविधांची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येणार असल्याने राज्याचा झपाट्याने विकास होईल, असेही ते म्हणाले.

## शेतकरी बांधवांनी इ केवायसी करून घ्यावी;तहसिलदार आर. यु. सुरडकर यांचे शेतकरी बांधवांना जाहीर आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड | सय्यद रहीम रजा

दि.२८ उमरखेड तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना कळविण्यात येते, आपल्या तालुक्यातील बरेच शेतकरी बांधव हे केवायसी नसल्यामुळे अनुदानापासून वंचित आहेत. त्यांनी आपली पेंडिंग केवायसी करून घेतल्यास त्यांना त्यांच्या अनुदानाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे पेंडिंग इ केवायसी मध्ये ज्या शेतकरी बांधवांची नावे आहेत. त्यांनी मंडळ अधिकारी तलाठी कोतवाल यांच्या कडून ीज्ञ नंबर प्राप्त करून आपल्या गावातील लील सेंटर आपले सरकार सेवा केंद्र ग्रामपंचायत ऑपरेटर ..यांच्या कडे आपली इ के वाय सी लगेच करून घ्यावी.त्यानंतर आपली मदत शासनस्तरावरून आपल्या खात्यात थेट जमा होईल. दिनाक २९ जून २०२४ पर्यंत शज्ञूल ० करायची आहे. तरी शेतकरी बांधवांनी शज्ञूल करून घ्यावी असे उमरखेड तहसिल प्रशासनाच्या वतीने तहसिलदार आर. यु. सुरडकर यांनी आवाहन केले आहे.

## मातंग क्रांती मोर्चाच्या नियोजनाची ३० जून रोजी शिर्डी येथे दुसरी बैठक

लोकनेता न्यूज नेटवर्क | आष्टी | अण्णासाहेब साबळे

सकल मातंग समाजातील समाजातील सर्व संघटनांना व संघटनेच्या नेत्यांना व समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांना कळविण्यात येते की नियोजित मातंग क्रांती मोर्चाच्या

नियोजनाची पहिली बैठक अहमदनगर येथे यशस्वी पार पडली.नियोजित मातंग क्रांती मोर्चाच्या नियोजनाची दुसरी बैठक शिर्डी येथे हॉटेल साई सहवास येथे दुपारी एक वाजताआयोजित करण्यात आली आहे.तरी नियोजन करण्यासाठी आपले मार्गदर्शन व आपले नियोजन अत्यंत महत्त्वाचे असल्याकारणाने आपण या बैठकीला उपस्थित राहावे ही संयोजकातर्फी विनंती करण्यात येत आहे.संयोजक सकल मातंग समाज अहमदनगर जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले.

## कोडं महाराष्ट्राचं

लोकनेता न्युज नेटवर्क

वाद मराठा-ओबीसीचा आता थांबणाऱ्यातला नाही,
अन् त्या पावसाळी अधिवेशनाकडे लक्ष मात्र कुणाचच नाही...


कुणी घालतय राजुरेश्वराला जरांगेंच्या आयुष्याचं साकडं,
तर कुणी रचतंय भुजबळांसाठी चितेची लाकडं...

कुणी लावतय जंगलेल्या तलवारीला धार,
तर कुणी करतय दगडफेकीचा वार...

एकीकडे कुणी थोपटतय दंड,
तर दुसरीकडे कुणी पुकारतय बंड...

कुणी भाजतय राजकारणाची पोळी,
तर कुणी घातली जातिवादाची चोळी...

आता मला भीती वाटतिये गोर गरीब चिमुकल्यांच्या भविष्याची,
कधी होईल एकत्र जनता माझ्या महाराष्ट्राची...



पुजा सरिता संजय जायभाये

## कंधार शहरांत अनधिकृत अतिक्रमण जेसीबीने हटविले;मुख्य रस्त्याने घेतला मोकळा श्वास

### कंधार नगरपरिषद चा अतिक्रमण धारकांना दणका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार | धोंडीबा मुंडे

कंधार नगर परिषद प्रशासनाने दि.२७ जून २०२४ रोज गुरुवारी दुपारी जेसीबी मशीनच्या साह्याने पंचायत समिती कार्यालय, महाराणा प्रतापसिंह चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अतिक्रमण हटवून अतिक्रमण धारकांना मोठा दणका दिल्यामुळे अखेर मुख्य रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे, त्यामुळे वाहनधारकासह पादचाऱ्यामधून आनंद व्यक्त केला जात आहे.



कंधार पंचायत समिती कार्यालयासमोर मुख्य रस्त्यावर काही अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण करून आपला व्यवसाय थाटला होता, त्यामुळे मुख्य रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनास व पादचाऱ्यास वारंवार अडथळा निर्माण होत होता, ही बाब शहरातील काही जागरूक नागरिकांनी तोंडी व लेखी निवेदनाद्वारे नगरपरिषदेच्या प्रशासनास लक्षात आणून दिली होती. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने वारंवार अतिक्रमण धारकांना तोंडी सूचना देऊनही सदरील अतिक्रमण काढून घेत नसल्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने ठोस भूमिका घेत दि.२७ जून २०२४ रोज गुरुवारी दुपारी जेसीबी मशीनच्या सहाय्याने व पोलीस बंदोबस्तात सदरील अतिक्रमण हटविले. त्यामुळे शहरातील मुख्य रस्त्याने व कंधार पंचायत समिती कार्यालयाने मोकळा श्वास घेतल्याचे दिसून येत आहे.

कंधार चे तहसीलदार तथा नगरपरिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी रामेश्वर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण हटाव पथक प्रमुख दीपक झाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषद कर्मचारी राजेश जोंधळे, राहुल खोडसकर, हरिदास कळसकर, बशीर पठाण, जमीर मोहम्मद, अझहर शेख, राकेश जोंधळे, सचिन म्हेसन्ना, श्रीकृष्ण वाघमारे, दिलीप कांबळे, सिद्धार्थ कांबळे, अब्दुल खादर, शेख जगन्नाथ निकम आधी सहनगरपालिकेतील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## आष्टी न.प.च्या दिव्यांगाच्या खात्यात ५% निधी जमा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी | राजू म्हस्के

आष्टी नगरपंचायत स्वउतपन्नातील ५ टक्के राखीव निधी दिव्यांगाच्या खात्यात नगरपंचायतच्यावतीने नगराध्यक्ष जिया बेग,सामाजिक कार्यकर्ते गणेश शिंदे मुख्याधिकारी बाळदत्त मोरे, लेखापाल प्रकाश हरकाळ यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.हा निधी मिळाल्यानंतर दिव्यांगात उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. आष्टी नगरपंचायत हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना नगरपंचायतच्या स्वउत्पन्नातून दिव्यांग कल्याणसाठी राखून ठेवलेल्या ५ टक्के अनुदानाचे एकूण ६१ दिव्यांग लाभार्थ्यांच्या खात्यात निधी आष्टी नगरपंचायतच्यावतीने वितरित करण्यात आला.यावेळी आष्टी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,पत्रकार गणेश दळवी, पत्रकार शरद रेडेकर,शिवकुमार तांबे,संजय निकाळजे,रुपाली योगे,चंद्रकांत जपलवार,रोहिणी पोतदार, सतीश घोडके,विशाल म्हस्के, विद्या शिंदे,अशोक गायकवाड,छाया धोंडे,सुधाकर देशमुख,निलेश पवार यांच्यासह नगरपंचायत कर्मचारी व दिव्यांग उपस्थित होते.

झाडे लावा झाडे जगवा

## चारोळी

प्रत्येक क्षण जगून घे
उणीव मग कशाची राहील
उधळीत जा हसरे क्षण
अंतरंगातून मग आनंद वाहील.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## डॉ.अभय शिंदे यांचे इंग्रजी पुस्तक जानेवारीत प्रकाशित होणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी | अण्णासाहेब साबळे



आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एडवोकेट बी.डी. हंबर्डे महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.अभय शिंदे यांच्या इंग्रजी अनुवादित कवितांचे पुस्तक दिनांक ०१जानेवारी २०२५ रोजी प्रकाशित होणार असून कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या कुसुमाग्रज पुरस्कार प्राप्त झिंदाबाद... मुर्दाबाद या गाजलेल्या कवितासंग्रहातील २५ कवितांचा हा अनुवाद आहे.मलपृष्ठावर प्रसिद्ध लेखक,कलावंत ज्ञानपीठ पुरस्कार विजेते गिरीश कर्नाड यांचे इंग्रजी भाषेतील अभिप्राय पत्र असून,आत संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे,प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांच्या शुभेच्छा लाभलेल्या आहेत.दरवर्षाप्रमाणे हंबर्डे महाविद्यालयात दि.०१ जानेवारी नियोजित कवी संमेलनात एडवोकेट बी.डी.हंबर्डे साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून पुरस्काराचे मानकरी नागराज मंजुळे,सिसिलिया कारव्हॅलो,अजीम नवाज राही तथा सचिव अतुल शेठ मेहेर,दिलीप शेठ वर्धमाने,डॉ.गणेश पिसाळ,सर्व मान्यवर संचालक मंडळ यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे यांच्या हस्ते प्रा.डॉ.अभय शिंदे यांच्या या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

## मुख्याध्यापक विलास नागेश्वर यांचा आज सेवापूर्ती गौरव सोहळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा | विशाल घंटे

कै.विश्वनाथराव नळगे माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक /प्राचार्य विलास लिंगोजी नागेश्वर हे नियत वयोमानानुसार दि.(३०) जून रोजी सेवा निवृत्त होत आहेत. त्यानिमित्त सेवापूर्ती गौरव सोहळा आज दि.(२९) जून २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता कै.विश्वनाथराव नळगे माध्यमिक विद्यालय लोहा येथे आयोजित केला असल्याची माहिती देण्यात आली.

सदरील सेवापूर्ती गौरव सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी केरबाजी बिडवई विठ्ठलेश्वर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, तर प्रमुख अतिथी म्हणून गोविंद नांदेडे पूर्व शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे, विशेष उपस्थिती शंकर उत्तरवार उपाध्यक्ष, अशोकराव चालिकवार सचिव, सदस्य सखाहरी वट्टमवार, नारायण चुडावकर, दिलीपराव तेललवार, लक्ष्मीकांत बिडवई, शशिकांत बिडवई, इंदुमती बिडवई, रत्नमाला बिडवई आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न होणार आहे. सदरील कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कै विश्वनाथराव नळगे प्राथमिक व माध्यमिक तसेच श्री केरबाजी बिडवई उच्च माध्यमिक विद्यालय लोहा चे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतिक कर्मचाऱ्यांनी केले आहे.



संपादकीय

# आनंदी वळणं



लोकनेता न्यूज नेटवर्क

काही व्यक्ती राग, द्वेष, ईर्ष्या, अहंकार, मत्सर, तिरस्कार अशा विकारांना सोबत ठेवून जीवन जगतात, तर काही प्रेम, करुणा आणि मैत्रीभावासह जीवनाची वाटचाल करत असतात. या सर्व बाबी अनुवांशिक, कौटुंबिक पार्श्वभूमी अर्थात वातावरण या माध्यमांतून किंवा पद, प्रतिष्ठा आणि संपत्ती आल्यानंतर व्यक्तीत निवास करीत असतात. द्वेष, ईर्ष्या अशा विकारांसह वाटचाल करणाऱ्या व्यक्ती आनंदी वळणांपासून कायम फटकून असतात, तर मैत्रीभाव जपणाऱ्या व्यक्ती आनंदी वळणांवर क्षणकाळ थांबून आनंद लुटत असतात.

आनंदी वळणं रोजच्या जगण्यात आपल्या दृष्टीस पडतात. एखादी पत्ता विचारणारी अनोळखी व्यक्ती आपणास थांबवून विचारणा करीत असेल आणि त्याला योग्य तो मार्ग सुचवला तर त्याच्या चेहऱ्यावरची कृतज्ञता आपल्याही चेहऱ्यावर हलकंसं स्मित देऊन जाते. त्या क्षणी तुम्ही समोरच्या व्यक्तीला तुच्छतेने झटकलं तर आपण आपले आणि त्या व्यक्तीचेही काही क्षण बिघडवलेले असतात. समोरच्या व्यक्तीला हवा असलेला पत्ता माहीत नसेल तरीही ते योग्य पद्धतीने सांगून तो क्षणभराचा संवाद सुखकारक करता येतो. घरात आपण कायमच शिस्तीचा अतिरेकी आग्रह धरत असू तर आपल्याच कुटुंबात, आपल्याच जवळच्या माणसांमध्ये आपण एकटे पडत जाणार, याची जाणीव असली पाहिजे. हे अंतर इतके वाढत जाते की, अगदी आनंदाच्या क्षणीही कुटुंबातील सदस्य आपल्याला सहभागी करून घेत नाहीत. शेजारच्या मुलांच्या गोंगाटाने आपण अस्वस्थ होऊन त्यांची चूक कधीतरी प्रेमाने ध्यानात आणून देणे सहज शक्य असते. मुलं आपल्याला चांगला प्रतिसाद देतातही, पण आपण या मुलांचा सतत रागराग करत असू तर आपली प्रतिमा परिसरात डागाळेल, याचं भान ठेऊन त्यांच्याशी मैत्री करण्याचा आणि त्यांच्यासोबत आनंद लुटण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मी नियमित 'मॉर्निंग वॉक'ला जातो, सोबत आमचा पाळीव कुत्रा असतो. एक व्यक्ती त्यांच्या कुत्र्यासह सकाळी फिरायला येत असे. एक दिवस ती व्यक्ती एकटीच दिसली. मी सहजच विचारले, 'आज एकटेच?' त्या व्यक्तीने सांगितले, 'आज त्याचा मूड नव्हता.' आम्ही दोघेही हसलो. त्यानंतर रोज आम्ही दिसलो की एकमेकांकडे बघून हात हलवतो, स्मित हास्य करून अभिवादन करतो. अशा काही क्षणांनी आयुष्य अधिक सोपं आणि आनंददाय होतं. काही बाबी आपण उगाचच टाळतो. बरेचदा परिचित व्यक्ती दिसली तरी त्याचा एखादा जुना कटू अनुभव आठवणीतून वर येतो. आपोआपच आपण वाट बदलून, चेहरा फिरवून निघून जातो. आठवण कटू असली तरी त्यावर काळ हे औषध गुणकारी ठरते. त्यातुळे तो अनुभव मागे टाकून संवाद नव्याने वाढवणं उत्तम. कदाचित तेव्हा कोणा तरी एकाचा गैरसमजही झालेला असू शकतो. संवाद वाढला तर त्यामागचे सत्यही कळू शकेल. मुळात माणसाला टाळणे म्हणजे आपण एकलकोंडे होत आहोत, याचे पहिले चिन्ह.

मित्रांमध्ये आपली संपत्ती, बॅलन्स अशा बाबींची चर्चा प्रत्येक वेळेस अजिबात योग्य नाही. समवयस्क लोकांत वावरताना आर्थिक बाबींवर चर्चा टाळली पाहिजे, म्हणजे अशा चर्चेतून होणारी तुलना आणि त्यातून येणारा तणाव टाळला जाईल. आपला आविर्भाव इतरांना खजिल करणारा नसावा. मित्र, नातेवाईक यांच्या मैफलीत मी आणि मीच बोलणार, असा आपला खाक्या असेल तर कालांतराने आपण त्यातून वजा होत जाऊ. आपण आपली चेष्टा, मस्करी सहन करू शकत असू, तर आपण कुठेही सहज मिसळू शकतो. खरे तर आपणही आपली चेष्टा केली पाहिजे. हास्यविनोद होईल याकडे आपला कल असला पाहिजे.अशी साधी साधी वळणं आपल्या जीवनात रोजच येत असतात. त्या वळणांवर आपण थांबून आनंद लुटतो की टाळून पुढे जातो, हे सर्वस्वी आपल्या स्वभावावर अवलंबून आहे. अशा वळणांवर आपण थांबत असू तर कोणत्याही प्रसंगाला हसत सामोरे जाण्याची आपली इच्छाशक्ती अधिक दृढ होत जाईल, याची खात्री बाळगावी.

# युध्दाचे कारण काहीही असले तरी त्यात होणारी लष्करी हानी ही कोणत्याही देशास भरून न निघणारी-पद्माकर उखळीकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे





युध्दाचे कारण काहीही असले तरी त्यात होणारी लष्करी हानी ही कोणत्याही देशास भरून न निघणारी. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धातून लक्षात हे ठळक दिसते.पहिल्या महायुद्धाचे कारण पाहिले तर पहिल्या महायुद्धाचे उद्दिष्ट असलेले ट्रिगर २८ जून १९१४ रोजी साराजेव्हो येथे एका महान व्यक्ती आर्कड्यूक फ्रांझ फर्डिनांडची हत्या. ऑगस्ट १९१४ मध्ये ब्रिटनने जर्मनीविरुद्ध युद्ध घोषित केले. फ्रान्स आणि ब्रिटनने युरोपात तसेच आफ्रिकेत जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.हे युद्ध २८ जुलै१९१४ पासून ११ नोव्हेंबर १९१८ पर्यंत चालले. इतिहासातील सर्वात मोठ्या युद्धांपैकी एक अश्या या युद्धात ७ कोटी सैनिकांनी भाग घेतला ज्यापैकी ६ कोटी सैनिक युरोपियन होते. भांडखोर देशांची तांत्रिक आणि औद्योगिक प्रगती आणि प्रदीर्घ खंदक लढायांतून निर्माण झालेली 'जैसे थे' परिस्थिति यामुळे या युद्धात आणि त्याबरोबर झालेल्या विविध शिरकाणांमध्ये ९ लाखांपेक्षा जास्त सैनिक व ७ लाख नागरिक ठार झाले. हा इतिहासातील सर्वात घातक संघर्षांपैकी एक आणि त्यात सामील असलेल्या अनेक देशांमध्ये क्रांती किवा मोठ्या राजकीय बदलांसाठी कारणीभूत झाला. युद्धापूर्वीच्या सुप्त संघर्षांचे पूर्ण निराकरण न झाल्याने या युद्धाअखेरीस एकवीस वर्षांनंतर झालेल्या दुसऱ्या महायुद्धाची बीजे रोवली गेली.

२८ जून १९१४ रोजी सारायेव्होमध्ये जहाल युगोस्लाव्ह राष्ट्रवादी प्रिन्सिप यांनी ऑस्ट्रिया-हंगेरीच्या सिंहासनचा वारसदार असलेल्या ऑस्ट्रियाचे आर्चड्यूक फ्रांझ फर्डिनांड यांची हत्या केली आणि या युद्धाची ठिणगी पडली. फ्रान्झ फर्डिनांडच्या मृत्यूनंतर जर्मन साम्राज्याच्या चिथावणीवरून ऑस्ट्रिया-हंगेरीने सर्बियासोबत युद्धाची घोषणा केली. प्रिन्सिप हा बोस्नियन सर्ब विद्यार्थी होता ज्याने ऑस्ट्रिया -हंगेरीच्या सिंहासनाचा वारसदार आर्कड्यूक फ्रांझ फर्डिनांड आणि त्याची पत्नी सोफी, डचेस वॉन होहेनबर्ग यांची २८ जून १९१९ रोजी साराजेव्होमध्ये हत्या केली होती. म्हणजे १०५ वर्षांपूर्वी आजच्या दिवशी .प्रिन्सिप या अवघे २० वर्ष सुद्धा न ओलांडलेल्या विद्यार्थ्यांमुळे पहिले महायुद्ध सुरू झाले. १९१४ आणि १९१८ दरम्यान ३० हून अधिक राष्ट्रांनी युद्ध घोषित केले. बहुसंख्य सर्बिया, रशिया, फ्रान्स, ब्रिटन, इटली आणि युनायटेड स्टेट्ससह मित्र राष्ट्रांच्या बाजूने सामील झाले. त्यांना जर्मनी, ऑस्ट्रिया- हंगेरी, बल्गेरिया आणि ऑट्टोमन साम्राज्य यांनी विरोध केला, ज्यांनी एकत्रितपणे केंद्रीय शक्तींची स्थापना केली.

या आधीच्या दशकात झालेल्या विविध करारांनी युरोपातील सर्वच देश परस्परांशी बांधले गेले होते. त्यामुळे जेव्हा २३ जुलै रोजी ऑस्ट्रिया-हंगेरीने सर्बियाला निर्वाणीचा इशारा पाठवला, तेव्हा एक राजनैतिक पेचप्रसंग निर्माण झाला. काही आठवड्यांतच प्रमुख सत्ता युद्धात उतरल्या, आणि जुलै १९१४ मध्ये बाल्कन भागात सुरू झालेले हे युद्ध झपाट्याने पूर्ण युरोपभर पसरले. सर्वात आधी २४-२५ जुलै रोजी रशियाने आपलया सैन्याची अंशतः जमवाजमव सुरू केली. २८ जुलै रोजी ऑस्ट्रो-हंगेरियन लोकांनी सर्बियाविरुद्ध युद्ध घोषित केले त्यापाठोपाठ रशियाने ३० जुलै रोजी जाहीरपणे सैन्याची जमवाजमव सुरू केली. जर्मनीने ही जमवाजमव थांबवण्यासाठी रशियाला ३१ जुलैच्या मध्यरात्री रशियाला निर्वाणीचा खलिता पाठवला. रशियाने ही मागणी अमान्य केल्यानंतर १ ऑगस्ट रोजी जर्मनीने रशियाविरुद्ध युद्ध जाहीर केले. रशियाबरोबरच जर्मनीने फ्रान्सलादेखील निर्वाणीचा खलिता पाठवला, आणि फ्रान्सच्या तटस्थतेची हमी म्हणून फ्रेंचांच्या ताब्यातील दोन किल्ले जर्मनीच्या ताब्यात देण्याची मागणी केली. ही मागणी पूर्ण करण्यास फ्रान्सने असमर्थता दर्शवली आणि १ ऑगस्ट रोजी सैन्याची जमवाजमव सुरू केली.३ ऑगस्ट रोजी जर्मनीने फ्रान्सविरुद्ध युद्ध जाहीर केले. फ्रान्स आणि जर्मनी यांच्यातील सीमा दोन्ही बाजूंनी मजबूत होती. त्यामुळे श्लिफेन योजनेनुसार, जर्मनीने तटस्थ बेल्जियम आणि लक्झेंबर्गवर आक्रमण करून उत्तरेकडून फ्रान्सवर चढाईची तयारी केली. यात बेल्जियन तटस्थतेचे उल्लंघन झाल्यामुळे ब्रिटनने ४ ऑगस्ट रोजी जर्मनीविरुद्ध युद्ध घोषित केले. मार्नच्या लढाईत जर्मन सैन्याची आगेकूच थोपवण्यात दोस्त राष्ट्रांना यश आले. त्यानंतर पश्चिम आघाडीवरच्या लढाईला एका प्रचंड वेढ्याचे स्वरूप आले आणि दोन्ही सैन्यांकडून खंदकांची एक मोठी साखळी तयार झाली. १९१७ सालापर्यंत या साखळीत फारसा फरक पडला नाही. पूर्व आघाडीवर रशियाने ऑस्ट्रिया-हंगेरीविरुद्ध यश मिळवले, पण जर्मन सैन्याने टॅनबेनबर्ग आणि मासुरियन लेक्सच्या युद्धात रशियाचे पूर्व प्रशियावरील आक्रमण परतवून लावले. नोव्हेंबर १९१४ मध्ये, ओस्मानी साम्राज्य केन्द्रीय सत्तांच्या बाजूने सामील झाले आणि कॉकेशस, मेसोपोटेमिया आणि सिनाई येथे नव्या आघाड्यांवर युद्धाला सुरुवात झाली. १९१५ मध्ये इटलीने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने भाग घेतला आणि बल्गेरिया केन्द्रीय सत्तांच्या बाजूने सामील झाला; १९१६ मध्ये रोमेनिया आणि १९१७ साली अमेरिकेची संयुक्त संस्थाने दोस्त राष्ट्रांत सामील झाले.मार्च १९१७ मध्ये रशियन सरकार कोसळले आणि नोव्हेंबरमध्ये एक क्रांती झाली आणि पुढील लष्करी पराभवानंतर रशियाला ब्रेस्ट लिटोव्हस्कच्या तहनीद्वारे सेंट्रल पॉवर्सशी संबंधित अटींचा लाभ झाला, ज्यामुळे जर्मनांना महत्त्वपूर्ण विजय मिळाला.१९१८ च्या वसंत ऋतू मध्ये वेस्टर्न फ्रंटला एक आश्चर्यकारक जर्मन आक्षेपार्ह साम्राज्य निर्माण केल्यानंतर, मित्र राष्ट्रांनी प्रतिस्पर्धी हल्ल्यांच्या मालिकेमध्ये जर्मन सैन्याला परतवून लावले. ४ नोव्हेंबर १९१८ रोजी, ऑस्ट्रो-हंगेरी साम्राज्य एक युद्धकलापात मान्य झाले आणि जर्मनीला क्रांतिकारकांशी स्वतःची समस्या होती, ११ नोव्हेंबर १९१८ रोजी युद्धनौकेवर सहमती दर्शवली, ज्यामुळे मित्र राष्ट्रांच्या विजयाची लढाई संपली.

युद्धाचे परिणाम जसे सैनिकांचे झाले तसे आरोग्य व आर्थिक घडामोडींवर देखील परिणाम झाले.इतर कोणत्याही युद्धाचे परिणाम या युद्धाएवढे मोठे नव्हते. या युद्धामुळे प्रशियन साम्राज्य, ऑस्ट्रिया-हंगेरीयन साम्राज्य, ओस्मानी साम्राज्य व रशियन साम्राज्य ही साम्राज्ये नामशेष झाली. बेल्जियम व सर्बिया या राष्ट्रांना भरपूर हानी पोहोचली होती. फ्रान्सचे १४ लाख सैनिक या युद्धात मृत्युमुखी पडले, रशिया व प्रशियाचे जवळपास एवढेच सैन्य मरण पावले.१९१४ ते १९१८ या काळात ८० लाख सैनिक युद्धात मृत्यू पावले, ७० लाख कायमचे जायबंदी झाले, तर १.५ कोटी सैनिक जखमी झाले. प्रशियातील १५.१%, ऑस्ट्रिया-हंगेरीतील १७. १% व फ्रान्समधील १०.५% पुरुष मृत्युमुखी पडले. ७,५०, ००० प्रशियन नागरिक ब्रिटनने केलेल्या नाकाबंदीत उपासमारीने मेले. युद्धसमाप्तीच्या काळात १ लाख नागरिक लेबेनानमध्ये दुष्काळामुळे मृत्युमुखी पडले होते. युद्धामुळे रशियामध्ये ऑक्टोबर क्रांती झाली, ज्याने बोल्शेविकांना रशियन सरकारच्या सत्तेत आणले. युनायटेड स्टेट्स एक जागतिक महासत्ता म्हणून उदयास आली. मस्टर्ड गॅस आणि फॉस्जीन यांसारखी रासायनिक शस्त्रे आणि मशीन गन, टाक्या आणि हवाई लढाऊ यांसारखे नवीन तंत्रज्ञान आणि विकास सादर करण्यात आले.मित्र राष्ट्रांनी चार वर्षांच्या लढाईनंतर पहिले महायुद्ध जिंकले आणि युद्धात झालेल्या जखमा किंवा रोगामुळे सुमारे ८.५ दशलक्ष सैनिकांचा मृत्यू झाला .

आता इराण इस्रायल हा ही संघर्ष तिसऱ्या युध्दाची वाट करून देईल?१९८५ पासून, इराण आणि इस्रायल हे चालू असलेल्या प्रॉक्सी संघर्षात गुंतले आहेत ज्याने मध्य पूर्वेच्या भूराजनीतीवर मोठ्या प्रमाणात परिणाम केला आहे आणि इराण आणि इस्रायली संघटनांमधील थेट लष्करी संघर्षांचा समावेश आहे, जसे की २००६ लेबनॉन युद्धात.इराणने अलीकडेच अझरबैजानच्या सीमेवर मोठ्या प्रमाणावर लष्करी युद्धे चालवली आणि उत्तर इराकच्या कुर्दिश प्रदेशातील कथित इस्रायली गुप्तचर तळांवर क्षेपणास्त्रे डागली. १८ जुलै २०१२ रोजी, बल्गेरियामध्ये इस्रायली पर्यटकांना घेऊन जाणारी बस एका बॉम्बहल्ल्यात नष्ट झाली ज्यात पाच इस्रायली पर्यटक आणि बल्गेरियन ड्रायव्हर ठार झाले आणि ३२ लोक जखमी झाले. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी या हल्ल्यासाठी इराण आणि हिजबुल्लाला जबाबदार धरले. त्यानंतर १ एप्रिल २०२४ रोजी इराणच्या सीरियातील दूतावासावर इस्रायलने हल्ला केला होता.युध्दाचे आणखी एक मुख्य कारण म्हणजे इस्रायल इराणला अस्तित्वाचा धोका म्हणून पाहतो आणि त्याच्या राजवटीवर नरसंहाराचा हेतू असल्याचा आरोप करतो. परिणामी, इराणला अण्वस्त्रे मिळवण्यापासून रोखण्यासाठी इस्रायलने निर्बंध आणि लष्करी कारवाईची मागणी केली होती.

भारत आणि इस्रायल यांच्यात मित्रत्वाचे संबंध घनिष्ठ आहेत. इस्रायलने १९५३ मध्ये मुंबईत वाणिज्य दूतावास उघडला. भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान इस्रायल भारताचा प्रमुख मित्र बनल्यामुळे हळूहळू सहकार्य केले १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्ध आणि १९९९ च्या भारत- पाकिस्तान युद्धादरम्यान इस्रायलने भारताला शस्त्रास्त्रे, दारूगोळा आणि गुप्तचर पुरवले. इराण-इस्रायल युद्धामुळे प्रदेशातील व्यापार मार्गांवर परिणाम झाला आणि जर तो पुढे वाढला तर त्याचा परिणाम महत्त्वाच्या सागरी मार्ग - होर्मुझच्या सामुद्रधुनीद्वारे व्यापारावर होऊ शकतो. येथे गडबड झाल्यास विलंब, वाढीव शिपिंग खर्च आणि जागतिक व्यापारात अस्थिरता येऊ शकते. त्यामुळे जगभरातील प्रत्येक देशांचे आपापल्या परिने आंतरराष्ट्रीय संबंध आहेत.ते विकासासाठी की, विध्वंसासाठी ?या प्रश्नांचा शोध प्रत्येक राष्ट्रांनी घेतला पाहिजे.अधिकाधिक नवकल्पना एकमेकांस दिल्या तर भारताच्या वसुधैव कुटंबकमची संकल्पना वास्तवात उतरेल.

-पदमाकर उखळीकर ,
मो.९९७५१८८९१२

# विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पुढील जीवनाची वाटचाल करावी- प्रा.डॉ.आनंद वाघ

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे



राजर्षी शाहू महाराजांची जयंती सणाप्रमाणे साजरी करा' या डॉ. बाबासाहेबांच्या आदेशाला प्रमाण मानून भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखा, बीडच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्यां जयंतीनिमित्त दिनांक २६ जून २०२४ रोज बुधवार या दिवशी जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सकाळी ठीक ९ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन मोटर सायकल रॅली काढण्यात आली तिचा समारोप राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्या जवळ झाला. या मोटारसायकल रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणावर समता सैनिक दलाचे सैनिक सहभागी होते. याच दिवशी संध्याकाळी ठीक ६ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, बीड येथील सभागृहामध्ये शाहू महाराजांच्या जीवनावर व्याख्यान आणि इयत्ता दहावी आणि बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. डॉ.आनंद वाघ हे प्रमुख व्याख्याते होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु.यशवंत कदम सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.आर.एम शिंदे साहेब (समाजकल्याण आयुक्त बीड), मा. महालिंग निकाळजे (भा. बौ. महासभा. जिल्हाध्यक्ष (प),
मा. नानाभाऊ हजारे (उपशिक्षणाधिकारी बीड), मा. एस. एम. साळवे (जिल्हा कृषी अधिकारी), मा. अमरसिंह ढाका (भा. बौ. महासभा. कोषाध्यक्ष (प), मा. संघर्ष गोरे (बीड पोलीस) यांची उपस्थिती लाभली.

सर्वच उपस्थित मान्यवरांनी शाहू फुले आंबेडकर यांच्या प्रतिमांना दीप धूप पुष्पाने अभिवादन केले. त्यानंतर व्याख्याते कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख उपस्थित मान्यवरांचे भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या पदाधिकाऱ्यांकडून त्यांना प्रत्येकी सन्मान चिन्ह पिंपळाचे झाड भेट म्हणून देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा, शहर अध्यक्ष एड. केतन गायकवाड यांनी केले. त्यानंतर प्रमुख उपस्थित मान्यवर आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी सुद्धा आपले मनोगत मांडले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा डॉ आनंद वाघ यांनी आपल्या प्रबोधनपर व अभ्यासू मार्गदर्शनामध्ये शाहू महाराजांच्या जीवनामध्ये त्यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये केलेली क्रांती, महिलांसाठी केलेले कायदे, विधवा पुनर्विवाह कायदा, आरक्षणाविषयीचे कायदे आणि वेदोक्त प्रकरण खूप छान प्रकारे विद्यार्थ्यांच्या भाषेमध्ये मांडले. विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचे जीवन चरित्र अवश्य वाचावे आणि विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचा आदर्श समोर ठेवून पुढील जीवनाची वाटचाल करावी असा संदेश आपल्या व्याख्यानातून दिला.

त्यानंतर बीड शहरामध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि प्रत्येकी दोन पुस्तक देऊन गुणगौरव करन्यात आला. यावेळी ८० गुणवंत विद्यार्थी त्यांच्या पालकांसोबत उपस्थित होते. सर्वच उपस्थित विद्यार्थी पालक आणि श्रोते यांना भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखेकडून मिठाईचे वाटप करण्यात आले. शेवटी समता सैनिक नितीन मुजमुले यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास आयु बबन वडमारे, आयु देविदास राऊत सर, आयु चक्रे सर, आयु वानखेडे बाबा, आयु.हनुमंत कांबळे,आयु अण्णासाहेब शेळके सर, आयु अंकुश चव्हाण सर, आयु मायकल वाघमारे, आयु दिनकर बोराडे साहेब, आयु अर्जुन जवंजाळ साहेब, आयु भास्करजी सरपते, भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हाध्यक्ष निसर्गंध ताई, गायकवाड ताई, सरपते ताई, मस्के ताई, वासनिक ताई, जाधव ताई,शोभाताई साळवी,ढाका ताई, पारवे ताई, पंडीत ताई, ई.येडे साहेब वारभुवन ई.कांचन गायकवाड मस्के सर विनोद सवाई आदींनी आपली विशेष उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी आयु. संदेश डोळस, ऍड. केतन गायकवाड, आयु. संतोष जोगदंड, आयु. दिपक कांबळे, आयु. गौतम खेमाडे, आयु. तेजेस वडमारे, आयु. अजय बाळशंकर, आयु. सदानंद वाघमारे, आयु. सिध्दांत वडमारे आयु. अमोल वडमारे, आयु. नितीन प्रधान, आयु. संजय सिरसट , आयु. सुयोग ओव्होळ, आयु. रोहन ससाणे, आयु. उमेश डोळस, आयु. किशोर वडमारे आयु. गणेश शिंदे, आयु. सचिन पवार, आयु. राजेश मस्के आयु. राहुल जावळे, आयु. गौतम सोनवणे, आयु. जितु धन्वे, आयु महादेव शिंदे या सर्वांनीच शहर शाखेच्या वतीने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सुतार सर यांनी केले.

# परळी बस स्थानक समोर व बस स्थानकात रिक्षा चालकांनी निर्लज्ज पणाचा गाठला कळस! मेन रोडवर अस्ताव्यस्त पार्किंग

## बसस्थानकातून रिक्षात भाडे भरणे चालू पोलीस प्रशासन व परिवहन अधिकारी अंध भूमिकेत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे




परळी शहरात वाहतूक कोंडीमुळे प्रवास करण्यास बराच वेळ जातो, आर्थिक प्रगती मंदावते, रस्त्यावरील किरकोळ भांडणे वाढतात, वाहन चालकांची चिडचिड वाढते, वाहनांचे इंधन मोठ्या प्रमाणावर जळते. ज्यामुळे ध्वनी आणि वायू प्रदूषण वाढते. दुचाकी स्वार हे भरधाव वेगात चालत असतात छोटे छोटे अपघात दररोज बसस्थानका समोर पहावयास मिळत आहेत दुचाकी स्वाराना गंभीर इजा होत असून भांडण तंटा हाणामारी यांचे प्रमाणात वाढ झाली असून या वाहतूक कोंडीला जबाबदार कोण? वाहतूक कोंडी का होते याचा आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे. जनमानसात असा समज असा आहे की रस्ते अरुंद, चौकात पोलिस उभे नसल्यास, वाहन चालकाच्या बेशिस्त वागणुकीने होते, मोठ्या,अवजड,माल-वाहतूक वाहना मुळे, बस/रिक्षा मुळे, फूटपाथ वाढविल्यास, गती रोधकांमुळे, फूटपाथ वरील अतिक्रमणाने बस थांब्यामुळे अडसर , फळा ची गाडे हॉटेल समोरील दुकाना समोरील वाहन पार्किंग मुळे वाहतूक कोंडी होतअसून याकडे पोलीस प्रशासन ठोस भूमिका कधी घेणार आटो चे हप्ते घेत सोयीनुसार, हेतू पुरस्पर आणि अनावधानाने दुर्लक्ष करत आहेत की काय आणि जे सर्वात महत्वाचे आहे वाहतूक कोंडीस धुतरफा पार्किंग काढून घेणे,रोडवरील अतिक्रमण उठवणे, यावर प्रतिबंध कधी होणार परळी शहर पोलीस प्रशासन म्हणजे साप सोडून जमीन बडविणे!जिकडे आर्थिक फायदा तिथं दाखवतात कायदा, अवैध खाजगी वाहनांना मोकळीक देणे म्हणजे वड्याचे तेल वांग्यावर काढणे असे म्हणावं लागेल.

## बारी समाजाच्या लढ्याला मोठे यश

# समाजासाठी स्थापन होणार आर्थिक विकास महामंडळ;अर्थमंत्री अजित पवार यांची घोषणा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

वालसावंगी । कौतिक हिवाळे

वर्षभरापूर्वी संतभूमी शेगाव येथे विविध मागण्यांसाठी बारी समाजाचे राष्ट्रीय अधिवेशन मोठ्या उत्साहात पार पडले होते.यावेळी देशभरातुन लाखो समाजबांधव या अधिवेशनाला आले होते.अनेक मागण्यासह बारी समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे ही देखील मागणी यामध्ये होती.अनेक महिन्यांपासून समाजाचे अध्यक्ष रमेश घोलप हे यासाठी प्रयत्न करत होते.अखेर आज बारी समाजाला आनंदाची बातमी मिळालीच असून आज अर्थसंकल्प सादर करत असताना अर्थमंत्री शिवाय उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारी समाजासाठी संत श्री.रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येणार असल्याचे जाहीर करताच सगळीकडे आनंदाचे वातावरण निर्माण झाले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे समस्त बारी समाजाने आभार मानले दरम्यान आज वालसावंगी येथे मोठा जल्लोष साजरा करण्यात आला फटाक्यांची आतिषबाजी, गुलालाची उधळण अन एकमेकांना पेढे भरवून जल्लोष करण्यात आला.शिवाय महायुती सरकारचे आभार देखील व्यक्त करण्यात आले.यावेळी तंटामुक्ती अध्यक्ष हिरालाल कोथलकर,किरणराजे कोथलकर,माजी सभापती लक्ष्मण मलेकर,अजिंक्य वाघ,विशाल असवार,किरण फुसे,भगवान पायघन,गणेश गाडेकर,गुड्डू शाह,शंकर कोथलकर,बाळासाहेब कोथलकर,श्रीराम फुसे,अनिल फुसे,विजय बेराड,प्रवीण पवार,भगवान वाघ,वसंत बेराड,अशोक भुते यांसह समाजबांधव आणि ग्रामस्थ उपस्थित होते.विशेष म्हणजे भर पावसात हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला..

बारी समाजाला आर्थिक विकास महामंडळ मिळावे म्हणून नुकतीच माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी सह्याद्री अतिथीगृहावर बारी समाजाच्या शिष्टमंडळाला घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत बैठक आयोजित केली होती.त्यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत सखोल माहिती देत याकडे लक्ष देण्याची मागणी केली होती. शिवाय बुलढाणा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांनी देखील काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बारी समाजाचे शिष्टमंडळ सोबत घेत निवेदन देत याविषयी लक्ष देण्याची मागणी केली होती. शिवाय बारी समाजाचे आमदार प्रवीण दटके,आमदार संजय कुटे हे देखील बारी समाजाला महामंडळ मिळावे म्हणून प्रयत्न करत होते. सर्वांचे आभार बारी समाजाने मानले आहे.

## अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या

# शिरूर शाखा अध्यक्षपदी राहुल चातुर आणि कार्याध्यक्षपदी संजीव मांढरे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

शिरूर । विवेकानंद फंड

अ.भा.मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या शिरूर तालुका शाखेची नूतन कार्यकारणी नुकतीच आज गुरुवार दिनांक २७ जून २०२४ रोजी तळेगाव ढमढेरे येथील शिक्षक भवन येथील बैठकीत जाहीर करण्यात आली.ज्येष्ठ समाजसुधारक उत्तमआण्णा भोंडवे यांच्या अध्यक्षतेखाली व संघटनेचे राज्य प्रतिनिधी सचिन बेंडभर यांच्या मार्गदर्शनाखाली समितीची निवड करण्यात आली. नूतन कार्यकारणी पुढील प्रमाणे उपाध्यक्ष गुरुनाथ पाटील, प्रमुख कार्यवाह विवेकानंद फंड,कोषाध्यक्ष संभाजी चौधरी,सहकार्यवाह सुनिल हरगुडे, प्रमुख सल्लागार उत्तमआण्णा भोंडवे,कार्यकारणी सदस्य कुंडलिक कदम,मनोहर परदेशी,मारुती कदम,शेखर फराटे,प्रशांत सासवडे.

विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासूनच मातृभाषेविषयीचे प्रेम व वाचनाची आवड वृद्धिंगत होण्यासाठी पुढील वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे नूतन अध्यक्ष राहुल चातुर व प्रमुख कार्यवाह विवेकानंद फंड यांनी सांगितले. तसेच उपस्थितांनी आपले मोलाचे विचार व्यक्त केले.यावेळी मसपा शिरुर शाखेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अर्थसंकल्प नव्हे महायुतीचा निवडणूक जाहीरनामा:महिलांसाठी योजना आणून सरकारने प्रायश्चित घेतले;वडेट्टीवारांचे बजेटवर टीकास्त्र

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

फसव्या योजनांची ठिगळं लावलेला खोकेसंकल्प आज अर्थमंत्र्यांनी विधानसभेत सादर केला आहे. अडिच वर्ष फक्त घोटाळे, टेंडर, कमिशन, टक्केवारी यातून मालामाल झालेल्या या महाभ्रष्टाचारी सरकारने आता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अतिरिक्त अर्थसंकल्पाच्या नावाखाली महायुतीचा निवडणूक जाहीरनामाच सादर केला आहे. महिलांसाठी योजना आणून या सरकारने प्रायश्चित्त घेतले आहे. अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अतिरिक्त अर्थसंकल्पावर टिकास्र डागले आहे. आज विधानसभेत अर्थमंत्र्यांनी अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केल्यानंतर वडेट्टीवार यांनी जळजळीत प्रतिक्रीया दिली आहे. वडेट्टीवार म्हणाले की, अर्थसंकल्पाच्या आडून महायुतीच्या आमदारांना खूश करण्यासाठी केलेला हा शेवटचा प्रयत्न म्हणजे हा अतिरिक्त संकल्प आहे. अडिच वर्षे तिजोरी साफ करून झाल्यावर सरकारी तिजोरीवर महायुती सरकारने शेवटचा हाथ मारून तिजोरी साफ केली आहे. स्वत:चे खोके भरून झाल्यावर जनतेसाठी काहीतरी केल्याचा केविलवाणा प्रयत्न या अर्थसंकल्पात केला आहे.महिलांसाठी योजना जाहीर करून महायुती सरकारने प्रायश्चित्त घेतले आहे. महायुतीमधील एका नेत्याने बहिण-भावाच्या नात्यावर केलेले घाणेरणे वक्तव्य महायुतीला चांगलेच महागात पडले आहे.

# माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम घेऊन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे



चाळीस वर्ष भारतीय सैन्यात सेवा बजावल्यानंतर माजी सैनिक प्रकाश वाघमारे निवृत्तीच्या नंतरही आपला समाजसेवेचा वसा कायम ठेवला आहे.समाज हिताचे प्रश्न घेऊन वेळोवेळी आंदोलने, धरणे उपोषणे केली आहे. समाज हिताच्या चळवळीत साठी योगदान देत आहेत.त्यांनी देश सेवेनंतर समाजसेवेचे वृत्त हातीती घेतले आहे. समाजाप्रती आपण काही तरी चांगलं करायचं आहे ही भावना कायम. माजी सैनिका प्रकाश वाघमारे यांनी त्यांचा वाढदिवस आगळ्यावेगळ्या प्रकारे साजरा केला . वासनवाडी परिसरात असलेल्या रामगड येथील आदिवासी समीकरणे येथील अनाथ बालकासमवेत आपला वाढदिवस साजरा केला.अनाथ, निराधार, वंचित उपेक्षित मुला मुलींसाठी एक महिना पुरेल एवढे किराणा सामान त्यांनी यावेळी भेट दिली.सहकुटुंब सहभागी होऊन परिसरामध्ये वृक्षारोपणही केले. एक आगळावेगळा उपक्रम राबवला. यावेळी त्यांनी असे सांगितले की महापुरुषांचे अनुकरण करून मुलांनीही मोठे बनाव व जिल्ह्याचं व आदिवासी समीकरण गुरुकुल च नाव मोठं करावं तसेच यावेळी त्यांनी पालकांना व संचालकांना असेही ग्वाही दिली की वेळोवेळी जर कसल्याही प्रकारे मदत लागली तर मी मदत करणार आणि येणाऱ्या काळामध्ये अशाच पद्धतीने सामाजिक उपक्रम राबवत राहणार आहेत. सत्कारास उत्तर देताना माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी म्हटले यावेळी त्यांच्यासमवेत त्यांचे कुटुंबातील सर्वसदस्य, संपादक बालाजी जगतकर संपादक गणेश शिंदे व आदिवासी समीकरणाचे सुधीर भोसले,त्यांचे सर्व सहकारी मुलं, मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गाईच्या दुधासाठी प्रति लिटर ५ रुपयाचे १ जुलैपासून अनुदान देण्याचा निर्णय

## सुरेश धस यांच्या मागणीला यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजु म्हस्के



विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज दुसरा दिवस आहे.अर्थमंत्री अजित पवार विधानसभेत महाराष्ट्राचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला.त्यात माजी आ. सुरेश धस यांनी दुधाला किमान पाच रुपये तरी भाव वाढवून द्या अशी मागणी केली होती.त्यावर राज्य शासनाने राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात गाईच्या दुधासाठी ५ रुपयाचं अनुदान प्रति लिटर देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.त्यामुळे माजी आ.सुरेश धस यांच्या मागणीला यश आल्याने शेतरीवर्गामधून समाधान मानले जात आहे.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज दुसरा दिवस आहे.अर्थमंत्री अजित पवार विधानसभेत महाराष्ट्राचा अतिरिक्त अर्थसंकल्पात पेट्रोल व डिझेल वरील मुल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळणार आहे. या अर्थसंकल्पात पाच केंद्रीय सशस्त्र दलातील जवानांना व्यवसाय करातून सूट, मुद्रांक शुल्क दंडात कपात, मुद्रांक शुल्क परतावा आदी माध्यमातून नागरिकांना दिलासा देण्यात आला आहे.या मध्ये शेतरीवर्गामधून दुधाचे भाव वाढावे म्हणून माजी आ.धस गाईच्या दुधासाठी ५ रुपयाचे अनुदान द्यावे अशी मागणी राज्य शासनाकडे केली होती.यावर विचार करत

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठीही घोषणा करण्यात आल्या आहेत.राज्यात गाव तिथे गोदाम या योजनेची घोषणा करण्यात आली आहे.त्यासाठी ३३१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.तसेच कापूस, सोयाबीन शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी ५०० रुपये देण्यात येणार आहेत. व गाईच्या दुधासाठी ५ रुपयाचं अनुदान प्रति लिटर देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. १ जुलैपासून हे अनुदान दिले जाणार आहे.

# वाळू धोरणात बदल करण्याची सरकारची तयारी:सुलभता आणण्याचाच सरकारचा प्रयत्न असल्याचे विखे पाटलांनी केले स्पष्ट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)



सर्व सामान्यांना परवडेल अशा दरात वाळू उपलब्ध होण्यासाठी सरकारने वाळू धोरण घेतले आहे. या धोरणामध्ये अधिक सुलभता कशी येईल हाच सरकारचा प्रयत्न असून, या धोरणातील बदला बाबत काही सुचना आल्यास त्यांचा स्विकार सरकार करेल अशी ग्वाही महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पावसाळी अधिवेशनाच्या दुस-या दिवशी उपस्थित करण्यात आलेल्या वाळू प्रश्नांवर बोलताना महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, गेली अनेक वर्षे या वाळू व्यवसायावर माफीयांचा प्रभाव होता. या व्यवसायातून गुन्हेंगारीकरणही वाढले. सर्वसामान्य माणसाला होणारा त्रास कमी व्हावा म्हणूनच या सभागृहात चर्चा करुन, सर्वकष असे वाळू धोरण सरकारने आणून त्याची अंमलबजावणी सुरु केली. या धोरणाबाबत अजूनही सर्वांशी संवाद साधून, तज्ज्ञांची चर्चा करुन या धोरणात अधिक सुधारणा कशा करता येईल, यासाठी सरकारची तयारी असल्याचे त्यांनी त्यांनी सांगितले.

वाळू व्यवसायाबाबत वेगवेगळे प्रवाह आता पुढे येत आहेत. यामध्ये वाळू खुली करण्यापासून ते ग्रामपंचायत तसेच नगरपालिका हद्दीमध्ये स्थानिक पातळीवर त्यांनाच रॉयल्टी घेण्याचे आधिकार देण्याची कार्यवाही देण्यात येतील का याबाबतही आता विचार करुन वाळू बंधनमुक्त करण्याबाबतही शासन विचार करीत असल्याचे स्पष्ट करुन मंत्री विखे पाटील म्हणाले की, मागील पाच ते सहा वर्षांची आकडेवारी पाहीली असता, नवीन वाळू धोरणामुळे राज्याच्या महसूल उत्पन्नात कुठेही नुकसान झालेले नाही.

## श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा येथील ओबीसी परिषदेला प्रचंड प्रतिसाद

# एकच पर्व ओबीसी सर्व चा नारा देत लोहा कंधारचा आमदार ओबीसीचा करण्याचा केला निर्धार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**





लोहा तालुक्यातील श्रीक्षेत्र खंडेरायाच्या माळेगाव यात्रा येथे दि. २७ जून रोजी दुपारी १ वाजता लोहा -कंधार तालुक्यातील सर्व ओबीसी बांधवांनी आयोजित केलेल्या ओबीसी परिषदेला प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड अविनाश भोसीकर होते तर प्रमुख अतिथी म्हणून लोहा न.पा.चे मा.लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी,माळाकोळी जि .प.गटाचे मा.जि.प. सदस्य चंद्रसेन पाटील, माजी जि.प. सदस्य देविदास महाराज गिते,संजय पवार, शिवा भाऊ नरंगले, माजी पं.स. सदस्य उतम भाऊ चव्हाण, मा. नगरसेवक युवराज वाघमारे मा. नगरसेवक रमेश माळी, सरपंच हनुमंत धुळगुंडे,सरपंच कैलास धोंडे,मा.सरपंच अर्जुन राठोड, रामचंद्र येईलवाड, डॉ.राम केन्द्रे,अंगद केन्द्रे, माऊली गिते, प्रा.नारायण केन्द्रे मा.सरपंच पिराजी धुळगुंडे, सरपंच जनार्दन तिडके,मा.उपसरपंच अरुण सोनटक्के, विजय वाघमारे,, साई शिंदे,मा.सरपंच तुकाराम लूटे, सरपंच लक्ष्मण केन्दे, , दत्ता शेटे सचिन सूर्यवंशी धीरज हाके, माजी पं.स. सदस्य भगवान मुंडे, डॉ.दिनकर जायभाये,गोविंद हाबगुंडे, सचिन बल्लोरे, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी परिषदेत काही ठराव मांडण्यात येऊन ते पास करण्यात आले यात ओबीसी नेते ना.छगन भुजबळ यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला,आब की बार लोहा -कंधार मतदार संघात ओबीसीचा आमदार, ओबीसीचे आरक्षण वाचले पाहिजे जात निहाय जनगणना झाली पाहिजे, लोहा -कंधार मतदार संघातुन ओबीसीचा एकच उमेदवार दिला पाहिजे व तो आमदार झाला पाहिजे आदी ठराव घेण्यात आले.. त्यानंतर लोहा -कंधार तालुक्यातील प्रमुख नेत्यांची भाषणे झाली. यावेळी बोलताना मा.नगराध्यक्ष म्हणाले की, आरक्षणाच्या संदर्भात मी तुमच्या सोबत सदैव आहे. लोहा -कंधार मधुन बहुजनाचा एकच उमेदवार निवडणूकीसाठी राहिला पाहिजे व तो निवडण्याचा अधिकार सर्व बहुजन समाजाला आहे . जो उमेदवार निवडला आहे त्यांच्या पाठीशी सर्व ओबीसी बहुजन समाज आहे असे मा.नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी म्हणाले. तसेच यावेळी बोलताना मा. जि.प. सदस्य चंद्रसेन पाटील म्हणाले की, आपल्या ओबीसी समाजाला संपविण्याचे काम ज्यांनी केले त्यांनी पक्ष पाहिला नाही.पंकजाताई मुंडे, महादेव जानकर, यांना पराभूत केले आपला स्वाभिमान दुखावला. आपल्या सर्वांना विनंती करतो की आपण सर्वांनी एकत्र यावे आपल्या नेत्यांचा बदला घेयायचा आहे. आगामी लोहा -कंधार मतदार संघात ओबीसीचा आमदार निवडला पाहिजे असे चंद्रसेन पाटील म्हणाले. तसेच यावेळी संजय पवार म्हणाले की, ओबीसी उमेदवारांच्या पाठीशी सर्व शक्तीनिशी उभे राहू, तसेच यावेळी ॲड अविनाश भोसीकर म्हणाले की ते लोक मतदानाच्या वेळेस सर्व एकत्र येतात तसेच आपण सर्वांनी एकत्र आले पाहिजे. यावेळी मोठ्या संख्येने ओबीसी समाज बांधव उपस्थित होते. तसेच सदरील ओबीसी परिषदेत झाल्यानंतर सर्वांनी श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा येथील श्री खंडेरायाच्या मंदिरात जाऊन श्री खंडेरायाचे दर्शन घेऊन ओबीसी समाजाला मतदान करण्याची शपथ घेतली .

# अतिवृष्टीची मदत मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून घ्यावी-तहसीलदार गोरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



**त्याबाबत तहसील कार्यालयाकडून तलाठ्यामार्फत जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले असून, बाधित शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी केली नाही. अशा शेतक-यांनी तात्काळ जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जावून ती करून घ्यावी, अन्यथा आपल्या आधार लिंक खात्यावर अनुदान जमा होणार नाही, असे तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.**

कंधार तालुक्यात गत दोन वर्षातील विविध नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची मदत मिळविण्यासाठी गावातील तलाठ्याकडून विशिष्ट क्रमांक मिळवून घेत ईकेवायसी करून घेणे अनिवार्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तात्काळ आपल्या खात्याची ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन कंधार चे तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी केले आहे.

माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे, माहे मार्च एप्रिल २०२३ मध्ये झालेल्या गारपिठ व अवकाळी पावसामुळे, जुन-जुलै २०२३ मधील झालेल्या अतिवृष्टीमुळे व माहे नोव्हेंबर २०२३ मधील अवेळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी तलाठी, ग्रामसेवक व कृषि सहायक यांची त्रिस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. या त्रिस्तरीय समितीमार्फत तालुतील शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले होते. आजपर्यंत ५ लाख १४ हजार १८३ शेतक-यांना ४१५ कोटी रुपयांचे अनुदान बें क खात्यावर वितरण करण्याची मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी जिल्ह्यातील ६६ हजार ३३९ शेतकरी यांनी ई-केवायसी न केल्यामुळे रक्कम रुपये ४२ कोटी नुकसान भरपाईचा निधी प्रलंबित आहे. तरी शेतक-यांकडून विशिष्ट क्रमांकासह लवकरात लवकर ई-केवायसी करून घेण्याची कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी मा. श्री अभिजीत राऊत यांनी तहसीलदारांना दिले आहेत.

त्या अनुषंगाने मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांच्याकडून निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये बाधित शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम वितरीत करण्याबाबत शासनाच्या पोर्टलवरून यादी अपलोड करण्याची कार्यवाही करण्यात आली. ही यादी अपलोड केल्यानंतर बाधित शेतकऱ्यांना आपल्या गावातील तलाठ्याकडून तघ (विशिष्ट क्रमांक) घेऊन ई-केवायसी करणे बंधनकारक आहे.

# अष्टविनायक मार्गावरील बिरोबा वाडी गावच्या हद्दीत अकरा वर्षीय शाळकरी मुलाचा अपघाती मृत्यू



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दौंड पाटस अष्टविनायक मार्गावरील बिरोबावाडी गावच्या हद्दीत अकरा वर्षीय शाळकरी मुलाचा अपघाती मृत्यु झाल्याची घटना घडली आहे. आयुष यादव असं या मुलाचं नाव असून या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी रस्ता अडवून धरला आहे या घटने संदर्भात आता पाटस पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

शाळेला येताना रस्ता ओलांडत असताना भरधाव पिकअप ने धडक दिल्याने या मुलाचा जागीच मृत्यू झाला आहे.या अपघातानंतर ग्रामस्थ संतप्त झाले असून संतप्त ग्रामस्थांनी रस्ता अडवून धरत ठिय्या आंदोलन केले.अष्टविनायक मार्ग रोखून धरला या ठिकाणी स्पीड ब्रेकर ची मागणी केली आहे.जो पर्यंत स्पीड ब्रेकर होत नाही तोपर्यंत उठणार नसल्याचा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला असून दौंड चे माजी आमदार रमेश थोरात यांनी देखील ग्रामस्थांच्या या मागणीसाठी आंदोलनात सहभागी होत पाठींबा दर्शवला आहे.याठिकाणी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## विजेचा लपंडाव बंद करा

# नसता महावितरण कार्यालयावर मोर्चा काढू-डॉ.गोपाल बच्छिरे



**महावितरण अभियंता यांना निवेदन देताना शिवसेना ऊबाठा चे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे, गजानन जाधव व इतर मान्यवर**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

विजेचा लपंडाव बंद करा अन्यथा महावितरण कार्यालयावर जनसामान्यांचा मोर्चा काढू असा इशारा शिवसेना उबाठा चे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे व शहर प्रमुख गजानन जाधव यांनी दिला.

लोणार शहर व ग्रामीण भागात महावितरण कंपनीकडून करण्यात येणारा वीज पुरवठा हा सदोष आहे सतत वीज खंडित होत आहे दिवसातून पंधरा ते वीस वेळा वीज खंडित होते आणि या विजेच्या लपंडावामुळे वीज ग्राहकांचे अतोनात नुकसान होत आहे व यास संपूर्ण तयार महावितरण कंपनीचा ढिसाळ कारभार जबाबदार आहे विजेच्या दबावातील कमी जास्त वीज प्रवाहमुळे सामान्य जनतेचे टीव्ही, फ्रिज, पंखे, विजेच्या मोटारी, विजेचे दिवे, हे जळून जात आहेत निकामी होत आहेत याकरिता वीज कंपनीने आपला ढिसाळ कारभार दुरुस्त करून घ्यावा व वीज ग्राहकांना अखंडित वीज देण्यात यावी नसता लोणार येथील महावितरण कार्यालयावर जनसामान्यांचा मोर्चा काढण्यात येईल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ.गोपाल बछिरे व शहर प्रमुख गजानन जाधव यांनी महावितरण चे अभियंता यांना निवेदनाद्वारे दिला. याप्रसंगी शिवसेनेचे सुदन अंभोरे, तानाजी मापारी, श्रीकांत नागरे, श्रीकांत मादनकर, लूकमान कुरेशी, इकबाल कुरेशी, अजय बछीरे, गणेश पाठे, अमोल सुटे, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# पुण्यस्मरणानिमित्त वृक्षारोपण स्तुत्य उपक्रम-भगवानराव (आबा)पाचपुते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



स्व.सुभाषराव मोरे आणि वृक्षमित्र स्व आबासाहेब मोरे यांनी सामाजिक उत्तरदायित्वातून पर्यावरण मंडळाची स्थापना केली.राज्यभर संस्थेच्या वाढत्या विस्तारातून प्रमोद मोरे वृक्षारोपण,वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण समतोलाचे उत्तम कार्य करीत आहेत.स्व.सुभाषराव मोरे यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त केलेले वृक्षारोपण आणि वृक्ष वाटप हा एक पर्यावरणीय स्तुत्य उपक्रम आहे,असे प्रतिपादन काष्टी येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भगवानराव पाचपुते(आबा )यांनी केले.श्रीगोंदा तालुक्यातील श्री क्षेत्र सुरेगाव येथे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांचे वडील स्व.सुभाष मोरे यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचा कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला होता.यावेळी पर्यावरण मंडळाच्यावतीने गुडमार वनौषधी वृक्षांचे वृक्षारोपण व वाटप भगवानराव पाचपुते,ह.भ.प. बाळकृष्ण दळवी महाराज, अध्यक्ष प्रमोद मोरे,वनश्री प्रवीण गुणवरे,कार्याध्यक्ष छायाताई राजपूत,प्रा.संजय लाकूडझोडे, सुभाष वाखारे,सुभाष धुमाळ, माजी संचालक अंकुश रोडे, सरपंच प्रसाद रामफळे,अध्यक्ष तुकाराम अडसूळ आदींच्या हस्ते करण्यात आले.यावेळी भगवानराव पाचपुते (आबा)यांनी मंडळाच्या या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, प्रमोद मोरे हे आपल्या चुलत्यांचा आणि वडिलांचा पर्यावरण संवर्धनाचा वारसा जपत असून महाराष्ट्रातील हजारो कार्यकर्ते त्यांच्या समवेत वसुंधरेला हिरवा शालू परिधान करण्याचे काम करीत आहे. त्यांच्या या पर्यावरण चळवळीला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे महत्त्वपूर्ण योगदान राहील. याप्रसंगी वडिलांच्या पुण्यस्मरणानिमित्त प्रमोद मोरे यांनी संगमनेर तालुक्यातील बाळेश्वर येथील बालसंस्कार व जनजागृती मानव कल्याण सेवाभावी संस्थेतील विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले.यावेळी मारुती कदम,अमोल चंदनशिवे, डॉ.शरद दुधाट,कोंडीराम नेहे, विजय बोडखे,चंद्रकांत भोजने, उत्तम पवार,सरपंच बाळासाहेब ढोले,बाळासाहेब गाडेकर, राजाराम ढवळे,मोहन खवळे, आशाताई कांबळे,मुख्याध्यापक रवींद्र पवार,मुख्याध्यापक शिवाजी उदार,महेश पाडेकर, मच्छिंद्र लहाकर,गुलाब रामफळे , डॉ अनिल मोरे,गणेश रोडे,यांच्यासह मंडळातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरक्षणाचे जनक छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन युवा आघाडी जिंतूर च्या वतीने वृक्षारोपण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जिंतूर । पंकज चव्हाण**



आरक्षणाचे जनक छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त नाग तीर्थ गंध कुटी भैय्या सज्ज बौद्ध विहार मोजे रायखेडा तालुका जिंतूर जिल्हा परभणी येथे वृक्षारोपण व झाडे लावून जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या वृक्षारोपण कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती भंते महानंद व भंते संघरत्न झाडे लावून जयंती साजरी करण्यात आली आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीला उपस्थित वंचित बहुजन आघाडी चे महासचिव सतीश वाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण करण्यात आले समवेत शरद दादा चव्हाण रिपब्लिकन सेना जिल्हाध्यक्ष परभणी प्राध्यापक राहुल वावळे सर आदित्य महाविद्यालय कुऱ्हाडी पत्रकार रत्नदीप शेजावळे भगीरथ मिरशे तालुका अध्यक्ष आ. भा आदिवासी विकास परिषद जिंतूर युवराज भैय्या घनसावंत युवा नेते रावसाहेब हरभरे अशोक प्रधान बळीराम उबाळे शंकर दादा वाघ भास्कर सूर्यवंशी कार्यकर्त्याच्या उपस्थित छत्रपती राजश्री शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्सव होता साजरी करण्यात आली

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904